**महाराष्ट्र जनशक्ती** | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ५१ वा | दिनांक : १६/११/२०२४ | वार : शनिवार

## वाट्टेल ते होऊ द्या, पण फडणवीसांना सत्ता मिळू देणार नाही: शरद पवारांचा ठाम निर्धार



**सांगली** : महाराष्ट्राच्या राजकारणात वाट्टेल ते झाले तरी चालेल, पण देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या घटकांच्या हातात राज्याची सत्ता जाऊ देणार नाही, असा ठाम निर्धार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शुक्रवारी सांगली जिल्ह्यातली कवठे महांकाळ येथील प्रचारसभेत बोलताना व्यक्त केला. त्यांच्या या निर्धाराची राज्याच्या राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

शरद पवार यांची शुक्रवारी तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात सभा झाली. यावेळी बोलताना त्यांनी उपरोक्त विधान केले. ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी डाव्या पक्षांना सोबत घेऊन निवडणूक लढत आहे. ही निवडणूक महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची आहे. राज्याच्या राजकारणात काहीही झाले तरी चालेल, पण महाराष्ट्राची सत्ता देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या घटकांच्या हातात जाऊ द्यायची नाही. आम्ही या निवडणुकीत केवळ जिंकण्यासाठी नव्हे तर काम करण्यासाठी मते मागत आहोत. आमच्याकडे ठोस कार्यक्रम आहे. त्यावर मतदारांनी मतदान करावे असा आमचा आग्रह आहे.

आज राज्याची सत्ता ज्यांच्याकडे आहे, ते पैशाचा गैरवापर करत आहेत. ते निवडणुकीत पैसा ओतून माणसे विकत घेण्याचा प्रयत्न करत आहेत. या सरकारचे हे धोरणच बनले आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यक्रमातील सत्यता पडताळून पाहण्याची गरज आहे. त्यांनी महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरू केली. हरकत नाही. महिलांना पैसे द्या. पण त्यांना पैसे देताना त्यांचे संरक्षण करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील महिला आज सुरक्षित आहेत, असे म्हणण्याची स्थिती नाही. महायुती सरकारच्या काळात महिलांवरील अन्याय अत्याचारांत मोठी वाढ झाली. दोन वर्षात राज्यातील ६७,३८१ महिलांवर अत्याचार झाले. जवळपास तेवढ्याच महिला बेपत्ता झाल्यात, असे ते म्हणाले.

शरद पवार यांनी यावेळी आपल्या पक्षाचे उमेदवार तथा माजी गृहमंत्री आर आर पाटील यांचे सुपुत्र रोहित पाटील यांच्या पाठिशी आपण भक्कमपणे उभे असल्याचेही ठणकावून सांगितले. ते म्हणाले, रोहित पाटील यांनी आपल्या भाषणात आपल्याला एकटे पाडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप केला. पण त्यांनी चिंता करू नये. तुम्हाला कुणीही एकटे पाडणार नाही. तासगाव व कवठे महांकाळ या २ तालुक्यांतील तरुणांची ताकद तुमच्या पाठिशी असेपर्यंत तुम्हाला चिंता करण्याची गरज नाही. याशिवाय त्यांच्यामागदे आर आर पाटील यांचीही पुण्याई आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात हे नाव माहिती आहे.

येथील खासदार उद्योगी असल्याची मला पूर्ण कल्पना आहे. त्यांची पहिली विधानपरिषद मला आजही आठवते. आर आर पाटील एकेदिवशी माझ्याकडे आले आणि म्हणाले, विधान परिषदेच्या एका जागेसाठी माझा आग्रह आहे. मी म्हणालो कुणासाठी हा आग्रह आहे. त्यावर त्यांनी संजय पाटील यांचे नाव घेतले. त्यानंतर मी त्यांना स्पष्टपणे हे नाव आपल्याला पसंत नसल्याचे सांगितले. तसेच त्यांना त्यांना दुसरे नाव सूचवण्याची विनंती केली. हे सांगण्याचे कारण म्हणजे संजय पाटील यांचा काहीही भरवसा नाही, ते त्यांच्यासोबत राहण्याची कोणतीही खात्री नव्हती.

त्यानंतरही आर आर पाटील यांच्या आग्रहामुळे आम्ही त्यांना आमदारकी दिली. ते ६ वर्षे आमदार राहिले. पण आपल्या आमदारकीच्या शेवटच्या दिवशीच ते भाजपत गेले. त्यानंतर ते १० वर्षे खासदार राहिले. आता खासदारकी गेल्यानंतर त्यांनी पुन्हा पक्षांतर केले. मी काही दिवसांपूर्वी त्यांना आता पुढे काय? असा प्रश्न केला. त्यावर त्यांनी आपल्या भागातील उमेदवाराला पाठिंबा देण्याचे सूतोवाच केले. पण ८ दिवसांतच त्यांनी विधानसभा निवडणुकीचा अर्ज भरला. एवढे हे अवसानघातकी आहेत, असे शरद पवार यावेळी भाजप उमेदवार संजयकाका पाटील यांच्यावर निशाणा साधताना म्हणाले.

शरद पवार यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले, आम्ही एकेकाळी नरसिंहराव यांच्या नेतृत्वात २५० हून कमी जागा असताना सरकार चालवले. पण मोदींनी लोकसभा निवडणुकीत ४०० पारचा नारा दिला. त्यामुळे आमच्या मनात शंका निर्माण झाली. त्यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान बदलण्यासाठी ४०० जागा हव्या होत्या. पण आम्ही इंडिया आघाडी स्थापन करून त्यांचा डाव उधळवून टाकला.

## राहुल गांधींचा थेट प्रकाश आंबेडकरांना फोन; दोन्ही पक्षामधील कटुता कमी होण्याची चर्चा

**मुंबई** : काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांना फोन केल्याची माहिती समोर आली आहे. या वेळी दोन्ही नेत्यांमध्ये औपचारिक चर्चा झाली. लोकसभा निवडणुकीत वंचित आघाडीसोबत महाविकास आघाडीची युती झाली नसल्यामुळे काँग्रेस आणि वंचित मध्ये दुरावा वाढला होता. मात्र तरी देखील प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसच्या काही उमेदवारांना पाठिंबा दिला होता. मात्र आता राहुल गांधी यांनीच फोन केल्यामुळे काँग्रेस आणि वंचित मधील कटुता काही प्रमाणात कमी होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांची अँजिओप्लॅस्टी शस्त्रक्रिया झाली होती. या शस्त्रक्रिये नंतर प्रकाश आंबेडकर यांनी पुन्हा एकदा निवडणूक प्रचाराला सुरुवात केली आहे. ते राज्यभरातील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारासाठी प्रचार सभा घेत आहेत. यादरम्यान ते बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव येथे प्रचार सभेसाठी आले असता त्यांना राहुल गांधी यांनी फोन केला असल्याची माहिती समोर आली आहे. राहुल गांधी यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या प्रकृतीची चौकशी करत काळजी घेण्याचे आवाहन देखील केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी तसेच वंचित बहुजन आघाडीमध्ये जागा वाटपाबाबत चर्चा झाली होती. प्रकाश आंबेडकर हे स्वतः काही बैठकींना उपस्थित होते. तरी देखील जागा वाटपाचा तिढा सुटला नाही. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीने स्वतः उमेदवार उभे केले. इतकेच नाही तर काँग्रेसच्या काही उमेदवारांना वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पाठिंबा देखील देण्यात आला होता. मात्र तरी देखील अकोला लोकसभा मतदारसंघात प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात काँग्रेसने उमेदवार दिला होता.

काँग्रेस पक्षाने प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात उमेदवार दिल्यामुळेच लोकसभा निवडणुकीत प्रकाश आंबेडकर हे तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले होते. मात्र आता राहुल गांधी यांचा फोन आल्यानंतर वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस यांच्यातील कटुता कमी होणार का? हे पहावे लागेल. या दोन्ही नेत्यांमध्ये काही राजकीय चर्चा झाली का? याबाबत मात्र अद्याप माहिती समजू शकलेली नाही.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १६ नोव्हेंबर २०२४


## हंबर्डे महाविद्यालयाचा हँडबॉल संघ राज्यातुन प्रथम




**आष्टी :** १९ वर्षाखालील राज्यस्तरीय शालेय हँडबॉल स्पर्धा-२०२४ या दिनांक १२ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर-२०२४ रोजी राजमाता जिजाऊ क्रीडा संकुलन बुलढाणा येथे पार पडल्या.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील एकूण आठ विभागाचे संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत ॲड. बी.डी.हंबर्डे महाविद्यालय आष्टी संघाने संभाजीनगर विभागाचे प्रतिनिधित्व करीत या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली मुंबई, पुणे, कोल्हापूर नाशिक, नागपूर, लातूर, अमरावती संघावर विजय मिळवून सुवर्णपदक पटकावले या या स्पर्धेतून पारस कानडे, अनुज शिंदे, चेतन राठोड सुमित खोत, गणेश कोळेकर या खेळाडूंची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय हँडबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड करण्यात आली या सर्व विजयी खेळाडूंचे आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे आदरणीय अध्यक्ष मा. श्री किशोर नाना हंबर्डे सचिव श्री अतुल काका मेहेर डॉ. गणेशजी पिसाळ साहेब श्री दिलीप शेठ वर्धमाने काका डॉ. गायकवाड साहेब प्रा. महेश चवरे श्री सुभान शेठ सर्व सन्माननीय संचालक मंडळ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सोपानराव निंबोरे सर उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे सर प्रा. अविनाश कंदले सर कार्यालयीन अधीक्षिका श्रीमती जाधव मॅडम सर्व प्राध्यापक बंधू शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले या खेळाडूंना प्रा. डॉ. संतोष वनगुजरे प्रा. माधव चव्हाण प्रा.किरण निकाळजे, अनिकेत निकाळजे यांचे मार्गदर्शन लाभले

## नाशिकमध्ये दुसऱ्यादिवशी मोठा राडा:भाजप-ठाकरे गटाचे कार्यकर्ते भिडले, अंबड पोलिस ठाण्यासमोर मोठी गर्दी



**नाशिक :** नाशिकमध्ये सलग दुसऱ्या दिवशी भाजप आणि ठाकरे गटामध्ये जोरदार राडा झाल्याचे पहायला मिळाले. दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी देखील झाली. मतदारांना स्लीप वाटण्यावरून झालेल्या वादातून ही हाणामारी झाली. या हाणामारीत एका कार्यकर्ता जखमी झाला. घडलेल्या प्रकारानंतर नाशिकच्या अंबड पोलिस ठाण्यासमोर मोठी गर्दी जमा झाली होती. पोलिसांनी मध्यस्थी करून जमावाला परत जाण्यास सांगितले.

नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातील सावता नगर परिसरात ठाकरे गटाचे उमेदवार सुधाकर बडगुजर यांचे कार्यकर्ते मतदारांना स्लीपचे वाटप करत होते. या दरम्यान भाजप कार्यकर्ते तेथे आले आणि ठाकरे गटासोबत त्यांचा वाद झाला. दोन्ही बाजूचे कार्यकर्ते आक्रमक झाले. दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांमधील हा वाद इतका विकोपाला गेला की, भांडण होऊन त्यांच्यात हाणामारी झाली. या हाणामारीत सुधाकर बडगुजर यांचा कार्यकर्ता जखमी झाला आहे. या घटनेनंतर ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी अंबड पोलिस ठाणे गाठले. भाजपचे कार्यकर्ते देखील पोलिस ठाण्यासमोर गेले.

भाजप आणि ठाकरे गटाचे कार्यकर्ते अंबड पोलिस ठाण्यासमोर एकत्र आल्याने मोठा गोंधळ उडाल्याचे पहायला मिळाले. कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी मोठा फौजफाटा तैनात केला होता. यावेळी इतर पोलिस ठाण्याचे अधिकारीही अंबड पोलिस ठाण्यात दाखल झाले होते. पोलिसांनी दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांना बाजूला केले. पोलिसांनी त्यांना परतण्याचे आवाहन केल्यानंतर दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते परत गेले.

दरम्यान, नाशिकमध्ये कालही दोन पक्षांमध्ये राडा झाला होता. भाजप आणि शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये हा राडा झाला होता. शरद पवार गटाचे उमेदवार गणेश गिते यांचे कार्यकर्ते पैसे वाटप करत असल्याचा आरोप भाजपच्या कार्यकर्त्यांनी केला होता. त्यानंतर दोन्ही गटात तुफान राडा झाला. या घटनेची माहिती मिळताच खासदार सुप्रिया सुळे या सभा रद्द करून पोलिस आयुक्तालयात दाखल झाल्या होत्या.

## अशोक चव्हाणांच्या लेकीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मैदानात; म्हटले — एक बार मैंने कमिटमेंट कर दी, तो मैं खुद की....



**नांदेड :** नांदेड जिल्ह्यातील भोकर विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा झाली. या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जोरदार फडकेबाजी करत महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. 'एक बार मैंने कमिटमेंट कर दी, तो मैं खुद की भी नहीं सुनता' असे म्हणत शिंदेंनी विरोधकांवर निशाणा साधला.

आम्ही हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांवर काम करत आहोत. त्यांनी आम्हाला एखादा शब्द देताना आधी शंभर वेळा विचार करण्याचे शिकवले आहे. शंभर वेळा विचार करूनच मी एखादा शब्द देतो. त्यामुळे या मतदारसंघाच्या विकासाबाबत तुम्ही निश्चिंत रहा. लाडक्या बहिणींना मिळणारे पैसे हे कायम सुरू राहतील, असा दावा देखील एकनाथ शिंदे यांनी केला. आपल्या लाडक्या बहिणींनी आता राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार असल्याचा दावा देखील एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

मी देखील शेतकरी कुटुंबातून आलो आहे. सर्वसामान्य कुटुंबातील आलो आहे. त्यामुळे जे सोन्याच्या चमचा घेऊन जन्माला आले, त्यांना दीड हजार रुपयांची किंमत कळणार नाही. ती किंमत आम्हाला कळते. शेतकऱ्यांना देखील शून्य बिल दिले जात असल्याचा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे. आमच्यासारखे ऐकणारे सरकार असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

हिंदू, मुस्लिम, शीख, ईसाई अशा सर्व जाती-धर्मांच्या लोकांसाठी आपण योजना आणली आहे. शेतकरी देखील सर्व जाती धर्माचे आहेत. त्यामुळे सर्वांना योजनेचा लाभ होतो. मात्र, लोकसभेमध्ये फेक नरेटीव्हच्या माध्यमातून संविधान बदलेल, अशी भीती लोकांच्या मनामध्ये निर्माण केली गेली. या फेक नरेटीव्हमुळे वेगळ्या पद्धतीचे मतदान झाले. मात्र जोपर्यंत चंद्र, सूर्य आहे. तोपर्यंत बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाला कोणीही हात लावू शकत नसल्याचा दावा, देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी विदेशात जाऊन आरक्षण रद्द करणार असल्याची भूमिका मांडतात. ते विदेशात जाऊन देशाची बदनामी करतात. हेच त्यांचे देशप्रेम असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. आपला भारत देशाचे नाव जगभरामध्ये मोठे करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्याबाबत कौतुक करण्याचे सोडा तर उलट त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचे काम विरोधक करत आहेत. मात्र केवळ माणुसकी म्हणून आपण काम करत असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

## उद्धव ठाकरे यांचा अब्दुल सत्तारांवर घणाघात



**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी सिल्लोडचे आमदार अब्दुल सत्तार यांना तुरुंगात डांबण्याचा इशारा दिला. सिल्लोडच्या गद्दाराचा पापाचा घडा भरला असून, मी त्याची चौकशी करून त्याला तुरुंगात डांबल्याशिवाय व येथील जनतेला भयमुक्त केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी महिलांना दरमहा ३ हजार रुपयांचे अर्थसहाय्य व सर्वसामान्य जनतेला ५ जिवनावश्यक वस्तुंचे भाव ५ वर्षासाठी स्थिर ठेवण्याचीही ग्वाही ही दिली.

उद्धव ठाकरे यांची शुक्रवारी दुपारी सिल्लोड विधानसभा मतदारसंघात सभा झाली. या सभेद्वारे त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे उमेदवार अब्दुल सत्तार यांच्यासह शिंदे, पंतप्रधान मोदी व अमित शहा यांच्यावर टीकेची झोड उठवली.

उद्धव ठाकरे म्हणाले, आज सगळ्या यंत्रणा भाजप व महायुतीच्या ताब्यात आहेत. पण आज मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटले. कारण, हेलिकॉप्टरमधून उतरल्यानंतर आज माझी बॅगच कुणी तपासली नाही. माझे महत्त्व एवढे कमी झाले की काय? ठीक आहे, तसे पाहिले तर सिल्लोड हा मतदारसंघ जालन्यात येतो. येथील मतदारांनी लोकसभा निवडणुकीत जे काही करायचे होते करून दाखवले. येथून कल्याण काळे यांना लोकसभेवर पाठवले. आता या सभेला जमलेल्या गर्दीवरूनही भविष्यातील विजयाची शाश्वती मिळत आहे.

या सरकारने गोरगरिबांची झोप उडवली. पण तुम्ही तुमच्या मालमत्ता भरपूर करून ठेवल्या आहेत. हे यापुढे चालणार नाही. जनता एकवटली तर कुणी कितीही मोठा असला तरी तो कोलमडून पडल्याशिवाय राहत नाही, हा या देशाचा इतिहास आहे. त्यामुळे मी भाजपच्या लोकांनीही सिल्लोड येथील गुंडागर्दी घालवून देण्याची ही संधी सोडू नये. भाजपचा सच्चा कार्यकर्ता ही गुंडागर्दी मोडून काढल्याशिवाय राहणार नाही हे मला माहिती आहे. आपण सर्वजण एकत्र येऊन गुंडागर्दी मोडून काढूया, असे उद्धव ठाकरे यावेळी अब्दुल सत्तार यांचा नामोल्लेख टाळत म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १६ नोव्हेंबर २०२४


## ऐन निवडणुकी च्या तोंडावर ऊस तोडणी मजुरांचे स्थलांतर सुरु



**कन्नड (अरुण थोरात):** यंदा चा ऊसतोडणी हंगाम उशिरा सुरु होत असला तरी ऐन निवडणुकी च्या धामधुमीत ऊसतोड मजूरांनी पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाने परिसरात स्थलांतर सुरु केले आहे.कन्नड तालुका बागयती शेती साठी प्रसिद्ध असला तरी, शेजारील सोयगाव तालुक्यातील अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, आदिवासी भागात येथे ऊस तोडणी करणार्यांना मजूरांची संख्या खुप मोठी आहे. आपल्या कोरडवाहू शेतीची कामे आटोपून दरवर्षी ऊसतोडणी हंगामात हजारो मजूर तालुक्यातील बारामती एग्रो सह पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाना ऊस क्षेत्रात स्थलांतर करतात. त्यामुळे दुर्गम भागातील वाड्या, तांडे ओस पडल्यागत भासतात. तालुक्यात सर्वाधिक ऊसतोडणी मजूरांची संख्या नागद, करंजखेड, चापानेर, चिकलठाण औराळा गटात आहे.

दरवर्षी ऊसतोडणी मजूरांची दिवाळी ऊसाच्या फडातच होत असते. यंदा साखर कारखाने उशिरा सुरु होत आहे. सध्या निवडणुकी ची धामधुम सुरु असतांना व मतदान तारिख जवळ आली असतांना हजारो मजूर आपल्या कुटूंबा सह स्थलांतरित होत असल्याने उमेदवार, कार्यकर्त्यांची धाकधुक वाढली आहे. याचा परिणाम मतदानाच्या टक्केवारी वर होणार असल्याने मतदाना साठी या मजूरांना गावातील मतदान केंद्रावर आणण्याची कसरत करावी लागणार आहे. तोडणी मजूरांची मतदान टक्केवारी उमेदवारांच्या विजय,पराजयाचे गणित बिघडवू शकते असे जाणकारांचे मत आहे.

## सारोळा, लंगडातांडा येथे अवैधरित्या गौणखनिज उपसा करणारी वाहने जप्त





**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड तालुक्यात महसूल पथकाने दि. १५ नोव्हेंबर रोजी सारोळा व लंगडातांडा येथे वेगवेगळ्या ठिकाणी टाकलेल्या धाडीत अवैधरित्या गौणखनिज उपसा करणारी वाहने जप्त केली आहेत. सध्या महसूल प्रशासन निवडणूक प्रक्रियेत व्यस्थ असल्याचा फायदा घेत वाळू तस्करांनी संधी साधण्याचा प्रयत्न केला. मात्र अवैधरित्या गौणखनिज तस्करांच्या मनसुब्यांवर पाणी फिरवीत तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्या पथकाने ही धाडसी कामगीरी पार पाडली.रात्री च्या सुमारास सारोळा ता.कन्नड जवळील अंजना नदी पात्रातून काही लोक अवैधरित्या वाळू तस्करी करीत असल्याची माहिती कन्नड महसूल विभागाला लागली. पहाटेच्या अंधारात धाडसीरित्या छापा टाकत पथकाने वाळू तस्कराची वाहने जप्त केली. यात अजिनाथ काशिनाथ ढमाले यांचे विना क्रमांक असलेले फार्गुसन कंपनीचे दोन ट्रॅक्टर, एम एच २० जी क्यू ५४६९ क्रमांकाचा एक जेसीबी अशी तीन वाहन अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक करतांना आढळल्याने ती जप्त करुण तहसील कार्यालय कन्नड येथे जमा करण्यात आली आहेत.

सदरील कामगीरी तहसीलदार विद्याचरण कडवकर, मंडळ अधिकारी पी. एस. सुरवसे, ग्राम महसूल अधिकारी बी. टी. घटे, डी. ए. एरंडे, एन. के. पाकळे, किशोर निकम, जी.जी. खिल्लारे, ए.एस. राऊत, भगवान व्यवहारे यांच्या पथकाने पार पाडली. तर दुपारी ०१:२० वा. लंगडातांडा शिवारातील गायरान जमिनीमधून शेख अस्लम (तिर्री) रा. कन्नड हे माती उपसा करुण विना क्रमांक ट्रॅक्टर च्या सहाय्याने माती भरुन वाहतूक करत असल्याचे आढळून आल्यामुळे ते जप्त करुण तहसील कार्यालयात जमा करण्यात आले आहे. ही कारवाई ग्राम महसूल अधिकारी बी.टी. घटे, डी.ए. एरंडे, एन.के.पोकळे, किशोर निकम, जी.जी.खिल्लारे, ए.एस. राऊत, भगवान व्यवहारे यांच्या पथकाने पार पाडली.

## अल्पवयीन पत्नीसोबत संमतीने लैंगिक संबंध ठेवणे हाही बलात्कारच

**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका प्रकरणावर सुनावणी करताना, १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या पत्नीसोबत संमतीसह शारीरिक संबंध ठेवणे हा बलात्कार असल्याचे म्हटले आहे. याशिवाय या गुन्ह्यात १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा झालेल्या व्यक्तीची शिक्षाही न्यायालयाने कायम ठेवली आहे. न्यायमूर्ती जी. ए. सानप यांच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या आदेशात, सत्र न्यायालयाच्या २०२१ च्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या २४ वर्षीय व्यक्तीची याचिका फेटाळून लावली. सत्र न्यायालयाने आरोपीला लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या तरतुदींनुसार, त्याच्या अल्पवयीन पत्नीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी दोषी ठरवले होते.

सत्र न्यायालयाने आरोपीला १० वर्षांची शिक्षा सुनावली होती. याचिकाकर्त्यांने दावा केला आहे की, पीडिता त्याची पत्नी असल्याने त्यांच्यातील शारीरिक संबंधांना बलात्कार म्हणता येणार नाही. मात्र उच्च न्यायालयाने पत्नीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल तर तिच्याशी सहमतीने शारीरिक संबंध ठेवण्याच्या आधारावर बचाव होऊ शकत नाही असे सांगितले. १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलीशी लैंगिक संबंध ठेवणे हा बलात्कार आहे, मग ती विवाहित असो वा नसो, असे खंडपीठाने म्हटले आहे.

२०१९ मध्ये महिलेने तक्रार दाखल केलेल्या तक्रारीत तिने ती आरोपीसोबत रिलेशनशिपमध्ये होती. परंतु तिने नकार देवूनही त्याने तिच्यावर बलात्कार केला आणि तिला गर्भवती केले असे नमुद केले आहे. यानंतर दोघेही एकत्र राहू लागले आणि लग्न केले. मात्र पतीने गर्भपात करण्याचा हट्ट धरल्याचे तक्रारीत म्हटले आहे. लग्नाच्या नावाखाली तिच्यावर अनेकवेळा बलात्कार केला आणि शारीरिक छळ केल्याचा आरोप महिलेने केला आहे.

न्यायालयाने सांगितले की, महिलेने मुलाला जन्म दिला असून डीएनए चाचणीनुसार आरोपी आणि महिला हे जैविक पालक आहेत. तर पतीने आपल्या याचिकेत दोषी नसल्याची कबुली दिली आणि तक्रारदार ही त्याची पत्नी आहे, त्यामुळे त्यांच्यातील शारीरिक संबंधांना बलात्कार म्हणता येणार नाही आणि हे संबंध सहमतीने होते. कथित घटनेच्या वेळी ही महिला अल्पवयीन नव्हती, असा दावाही त्याने केला. मात्र, न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य करण्यास नकार दिला. कागदोपत्री पुराव्यानुसार, तक्रारदाराचा जन्म २००२ मध्ये झाला होता आणि २०१९ मध्ये कथित घटना घडली तेव्हा ती अल्पवयीन होती.

## एकनाथ शिंदे यांना मी मुख्यमंत्री केले - अब्दुल सत्तार



**सिल्लोड :** माझ्यात मुख्यमंत्री बदलण्याची ताकद आहे, असा वादग्रस्त दावा शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी दोन दिवसांपूर्वीच केला होता. त्यानंतर अब्दुल सत्तार यांनी आज पुन्हा एक वादग्रस्त दावा केला आहे. मला मुख्यमंत्री बदलण्याचा अनुभव आहे. एकनाथ शिंदे यांना मी मुख्यमंत्री केले, असे वक्तव्य अब्दुल सत्तार यांनी केले आहे. सत्तार यांनी हे विधान भाजप नेते रावसाहेब दानवे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना केले. पण आता त्याची राज्यभर चर्चा होत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अब्दुल सत्तार सिल्लोड मतदारसंघ पिंजून काढत आहेत. मतदारसंघातील एका गावात सभेत बोलताना अब्दुल सत्तार यांनी रावसाहेब दानवे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. यावेळी मला मुख्यमंत्री बदलण्याचा अनुभव आहे, असे वक्तव्य सत्तार यांनी केले. तसेच सिल्लोडमधील उद्धव ठाकरे यांची सभा शिवसेनेची आहे की भाजपची हे कळत नाही, असा टोला उद्धव ठाकरेंना लगावला.

सध्या भाजपचे लोक खडखड करत आहेत, पण आमच्यात मुख्यमंत्री बदलण्याची ताकद आहे. मी गुवाहाटीला गेलो, बिर्याणी खाल्ली आणि मुख्यमंत्री बदलला. मी एका शेतकऱ्याच्या मुलाला हिंदुत्ववादी असलेल्या एकनाथ शिंदे यांनाच मुख्यमंत्री केले, एमआयएमचा मुख्यमंत्री केला नाही, असे ते म्हणाले. मला मुख्यमंत्री बदलण्याचा अनुभव आहे. आम्ही बंड केले नसते तर भाजपची सत्ता आली असती का? असा सवाल करत पुढेही एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री होणार, असा दावा अब्दुल सत्तार यांनी केला.

रावसाहेब दानवे यांनी यंदाच्या निवडणुकीत मला मदत केली असती, तर मला प्रचार करावा लागला नसता. लोकसभा निवडणुकीवेळी मी त्यांच्यासाठी लोकांकडे मते मागितली. पण जनतेने त्यांना मते दिली नाही. त्याचे खापर ते माझ्यावर फोडत आहेत. राजकारणात लपून छपून काम करणाऱ्या लोकांचे काय हाल होतात याचा अनुभव त्यांना लोकसभा निवडणुकीत आला आहे. आतापर्यंत लोकांनी धक्के आणि लाथा सहन केल्या. पण आता एखाद्याला धक्का मारला, तर लोक परत बुक्का मारतात, असा टोला अब्दुल सत्तार यांनी रावसाहेब दानवे यांना लगावला.

दुसरीकडे, अब्दुल सत्तार छत्रपती संभाजीनगरच्या सिल्लोड विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेत. शिवसेनेच्या ठाकरे गटाने त्यांच्यापुढे सुरेश बनकर यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे येथे तुल्यबळ लढत होण्याची शक्यता आहे. अब्दुल सत्तार यांनी ३ वेळा या मतदारसंघातून विजय मिळवला आहे. आता त्यांना चौथ्यांदा येथून त्यांचा विधानसभेवर जाण्याचा प्रयत्न आहे. यासाठी ते जोमाने प्रचार करत असल्याचे दिसून येत आहे.